स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील मानव्यविज्ञान शाखेंतर्गत 'इतिहास' विषयातील पीएच.डी. पदवीकरिता सादर करावयाच्या शोधप्रबंधाचा आराखडा

"अहिल्याबाई होळकर यांचे राजकीय,सामाजिक व धार्मिक कार्य आणि वर्तमान संदर्भ : एक चिकित्सक अभ्यास"

संशोधक

व्यंकटेश भगवानराव पेचफुले

मोबाईल क्र. 9405393103

मार्गदर्शक

डॉ. उत्तम राठोड

प्राचार्य, नुतन महाविद्यालय सेलू

ता. सेलू जि.परभणी

मोबाईल क्र.9421383319

संशोधन केंद्र

नुतन महाविद्यालय, सेलू

RRC. सप्टेंबर 2023

"अहिल्याबाई होळकर यांचे राजकीय,सामाजिक व धार्मिक कार्य आणि वर्तमान संदर्भ : एक चिकित्सक अभ्यास"

<u>प्रस्तावना</u>:

संशोधन ही ज्ञान प्राप्त करण्याची वैज्ञानिक पद्धती आहे.वर्तमान ज्ञानात नविन भर घालणे हे संशोधनाचे मुलभुत कार्य आहे. यावरुन 'वर्तमान स्थितीत सुधारणा घडवुन आणण्यासाठी जाणीवपुर्वक केलेल्या प्रयत्नांना संशोधन असे म्हणतात.' अर्थात संशोधन ही बौध्दिक प्रक्रिया असुन तिच्याद्वारे नविन ज्ञान प्रकाशात आणले जाते किंवा जुन्या ज्ञानातील उणिवा सुधारल्या जाऊन त्यात भर टाकली जाते.

मराठेशाहीच्या इतिहासात अहिल्याबाई होऴकर यांचे कार्य उल्लेखनीय आहे. त्यामुऴे त्यांचे राजकीय, सामाजिक व धार्मिक कार्य संशोधनाच्या माध्यमातुन समाजासमोर आणणे आवश्यक आहे. एक स्त्री असुनदेखील कौटुंबिक, सामाजिक, राजकीय इ सर्व भुमिका त्यांनी समर्थपणे सांभाऴल्या व स्त्रीयांसमोर व राज्यकारभाराबाबत एक आदर्श घालुन दिला. वर्तमानकाऴात अशा प्रकारचे कार्य ज्यांनी ज्यांनी केले असेल त्यांचा उल्लेख करुन समाजजीवनाला दिशा देता येईल.

<u>अभ्यासविषयाचे महत्व</u> :

अहिल्याबाई होऴकर यांनी आपल्या अठ्ठावीस वर्षाच्या राजकीय कारकिर्दीत राजकरण, समाज, धर्म व संस्कृती ई सर्वच क्षेत्रात भरीव कार्य केले आहे. सर्व जबाबदा-या यशस्वीपणे सांभाळुन स्त्री शक्तीचा प्रत्यय समाजाला दाखवुन दिला. प्रस्तुत शोधप्रबंधाच्या आधारे अहिल्याबाई होऴकर यांच्या अंगी असलेल्या त्याग, धैर्य, दानशीलता, प्रामाणिकपणा, सहनशीलता,धार्मिक आस्था, श्रद्धा,सामाजिक बांधिलकी, स्वजबाबदारीची जाणीव इ वैयक्तिक गुणांचा समाज बांधणीसाठी उपयोग होईल.त्यांच्या गुणांचे जीवनात अनुकरण होण्यासाठी आदर्श मिऴेल तसेच वर्तमान कालीन राजकीय, सामाजिक व धार्मिक क्षेत्रात सुधारणा घडवुन आणण्यासाठी या संशोधनाची मदत होईल. स्त्रियांक़डे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोन सकारात्मक, आदरयुक्त व समानतेचा निर्माण होण्यासाठी प्रस्तुत संशोधन विषय महत्वपुर्ण आहे.

वर्तमान जीवनात सकारात्मक बदल करण्यासाठी, त्यांच्या कार्याचे अनुकरण समाज व देशाच्या हितासाठी करणे आवश्यक आहे.या माध्यमातुन वर्तमानकालीन अशा व्यक्तींच्या कार्याचा आढावा घेता येईल. तसेच धर्माचे समाजजीवनातील महत्व ओळखुन धर्माच्या माध्यमातुन समाजाच्या सत्प्रवृत्ती जागवणे व कल्याणकारी राज्य निर्माण करणे या धार्मिक कार्याची चिकित्सा होणे गरजेचे असल्याने प्रस्तुत शोधप्रबंध महत्वपुर्ण आहे.

<u>अभ्यास विषयाची निवड</u> :

आपल्या भारत देशामध्ये आजपर्यंत अनेक प्रजाहितदक्ष शासनकर्ते होऊन गेले. जसे- सम्राट अशोक, सम्राट हर्षवर्धन,कृष्णदेवराय, मुगल बादशहा अकबर, छ. शिवाजी महाराज ई. या सर्व राजांवर अनेक विषयासंदर्भाने संशोधन झालेले आहे, परंतु अहिल्याबाई होळकर या एक स्त्री असल्यामुळे व इतर काही सामाजिक धारणेमुळे त्यांते कार्य पाहिजे त्या प्रमाणात समाजासमोर आले नाही. या पार्श्वभुमीवर अहिल्याबाईंच्या विविध क्षेत्रातील योगदानाचा सत्यतेने व वस्तुनिष्ठपणे अभ्यास करुन स्त्रीयांमध्ये असलेल्या योग्यता सिद्ध करुन, समाजाला त्यांच्या कार्याची ओळख करुन देण्यासाठी प्रस्तुत विषय हा शोधप्रबंधासाठी निवडला आहे.

<u>संशोधनाची उद्दिष्ट्ये</u> :

सत्य शोधुन काढणे हा संशोधनाचा मुख्य उद्देश असतो. ज्ञानाचा शोध हा जनतेच्या गरजा आणि कल्याण यांच्याशी संबंधित आहे.

प्रस्तुत अभ्यासविषय हा अहिल्याबाई होळकर यांच्या राजकीय, सामाजिक व धार्मिक कार्य जाणुन घेण्यासाठी व त्या कार्याची वर्तमान काळाशी तुलना करुन उपयोगिता सिद्ध करण्यासाठी हाती घेण्यात आलेला आहे. त्यासाठी पुढील उद्दिष्टये निश्चित करण्यात आली आहेत.

१. अहिल्याबाई होळकर यांच्या पुर्वीच्या राजकीय, सामाजिक व धार्मिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

२. अहिल्याबाई होळकर यांचे जीवन चरित्र व जीवनातील ठळक घटनांचा अभ्यास करणे.
३. अहिल्याबाई होळकर यांच्या सामाजिक कार्यातुन सामाजिक भेदभाव मिटवण्याचे कार्य, स्त्री-पुरुष समानता, जनहित, सेवा, परोपकार, दानशीलता ई गुण व कार्य जनतेपुढे आणणे व त्यांचे वर्तमान समाजजीवनातील महत्व ओळखुन त्यांच्याशी तुलना करणे.
४. अहिल्याबाई होळकर यांच्या प्रशासनिक योगदानाची समाजाला ओळख करुन देणे व वर्तमानकाळाशी त्यांची सांगड घालणे.
५. अहिल्याबाई होळकर यांच्या वास्तुशिल्प विषयक योगदानाचा अभ्यास करणे.
६. अहिल्याबाई होळकर यांच्या धार्मिक कार्यातुन झालेले धर्म व संस्कृतीचे रक्षण, समाजमनाच्या सत्प्रवृत्तीला आवाहन देणे इ. घटकांचा शोध घेणे, व्यक्ती व समाजजीवनातील धर्माचे महत्व प्रतिपादीत करणे. त्यातुन वर्तमानकालात धर्मक्षेत्रात शिरलेला अनाचार व भ्रष्टाचार यामुळे समाजाची होत असलेली अधोगती, दिशाभुल व शोषण यावर उपाय शोधता येईल.

संशोधनाची गृहितके :

प्रस्तुत अभ्यास विषयासाठी खालील गृहितके निर्धारीत करण्यात आलेली आहेत.

१) अहिल्याबाई होळकर यांच्या सामाजिक कार्यामुळे जनकल्याणकारी राज्याची व लोकशाहीसदृश संकल्पना निर्माण होण्यास मदत झाली.

२) अहिल्याबाई होळकर यांच्या राजनितीक योगदानामुळे माळव्यात मराठ्यांचे वर्चस्व निर्माण झाले व 18 व्या शतकातील एक महत्वाची राजसत्ता म्हणुन मराठेशाहीला मान्यता मिळाली.

३) अहिल्याबाई होळकर यांच्या राज्यकारभारविषयक कार्यामुळे प्रशासनात सूसुत्रता आली, आर्थिक बाबतीत काटेकोरपणा येउन समाजहित साधल्या गेले. वर्तमानकालीन राज्यकर्त्यांना यापासून प्रेरणा व दिशा मिळेल.

४) अहिल्याबाई होळकर यांच्या धार्मिक कार्यामुळे समाजमनाची सत्प्रवृत्ती जागी होऊन सामाजिक अस्मिता जोपासल्या गेली तसेच धर्म व संस्कृतीते रक्षण झाले.

५) अहिल्याबाई होळकर यांच्या विविध क्षेत्रातील योगदानामुळे स्त्रियांमध्ये असलेल्या विविध क्षमता व गुणांचा समाजाला परिचय होऊन स्त्रिजातीविषयी आदराची भावना निर्माण झाली. वर्तमानकाळातील स्त्रियांच्या विकासासाठी त्यांचा उपयोग होईल.

<u>तथ्य संकलनः</u>

मानव्य विज्ञानशाखेत (सामाजिक शास्त्रे) तथ्य संकलनाचे प्रमुख दोन प्रकार पडतात.

१) **प्राथमिक साधनेः**

यामध्ये ऐतिहासिक कागदपत्रे, सरकारी कागदपत्रे,बखर,दप्तर इ तत्कालीन दस्तऐवजांचा समावेश होतो.

२) **दुय्यम साधनेः**

यामध्ये सहाय्यक इतिहास ग्रंथ, ऐतिहासिक चरित्रे, नियतकालिके,वर्तमानपत्र, वार्षिक अंक, संदर्भ ग्रंथ इत्यादींचा समावेश होतो.

प्रस्तुत विषयाचा अभ्यास करताना वरील प्रकारच्या प्राथमिक व दुय्यम दोन्ही साधनांचा उपयोग करण्यात येणार आहे.

<u>संशोधन पद्धती</u> :

वर्तमानकाळ अधिकाधिक सकारात्मक, प्रभावी, कल्याणकारी होण्याच्या दृष्टिने ऐतिहासिक संशोधन केले जाते. प्रस्तुत अभ्यास विषयाची उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी खालील संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात य़ेईल.

१) ऐतिहासिक संशोधन पद्धती

२) क्षेत्रीय अध्ययन पद्धती

३) विश्लेषण पद्धती

४) वर्णन पद्धती

<u>संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा</u> :

प्रस्तुत शोधप्रबंधासाठी मराठेशाहीतील राजकीय, सामाजिक व धार्मिक परिस्थितीचा आढावा घेण्यात येणार आहे. अहिल्याबाई होळकर यांनी केलेल्या राजकीय,सामाजिक व धार्मिक कार्यातुन समाजोपयोगी व मराठेशाहीसाठी दिलेल्या योगदानाचा शोध घेतल्या जाईल. अहिल्याबाईंचे उजेडात न आलेले कार्य, कर्तृत्व इ बाबींचा चिकित्सक,वस्तुनिष्ठ अभ्यास करण्यात येईल. हा कालखंड मुख्य समजून **संशोधकाने संशोधनासाठी इ.स. 1725 ते 1795 हा कालखंड निश्चत केला आहे.**

<u>प्रकरणाची रुपरेषा</u>

प्रकरण पहिले :- विषयाची पार्श्वभुमी व अभ्यासाचे लक्ष्य

प्रस्तुत प्रकरणात अभ्यास विषयाची प्रस्तावना,अहिल्याबाई होळकर पुर्व राजकीय,सामाजिक व धार्मिक परिस्थितीचा आढावा घेण्यात येईल.राजकीय परिस्थितीमध्ये माळव्यातील सुभे,तेथील प्रशासन व्यवस्था,उत्पन्नाची साधने, महसूल पद्धती,न्याय व्यवस्था,लष्कर व्यवस्था, माळवा प्रांताच्या आसपासची इतर राज्ये इ घटकांवर प्रकाश टाकण्यात येईल. सामाजिक पुर्वपरिस्थितीचा आढावा- समाजात प्रचलित असलेली बहुपत्नीत्व,सतीप्रथा, केशवपन,बालविवाह,वतने,जातिबंधने,सामाजिक चालीरीतीमध्ये रुढी व परंपरांना असलेले प्राधान्य इ बाबींवर प्रकाश टाकण्यात येईल.धार्मिक पुर्वपरिस्थितीचा आढावा घेताना सांस्कृतिक जीवनात झालेली सरमिसळ, दुस-या धर्माची स्थिती,हिंदु धर्मीयांचे धार्मिक सण,उत्सव,तीर्थयात्रा,दान-धर्म,श्राद्ध,कर्मकांडे इ.धार्मिक परंपरांचे वर्णऩ करण्यात येईल. यातुन वर्तमान परिस्थितीचे विश्लेषण करण्यात येईल.अहिल्याबाईंचे कार्य समजून घेण्यासाठी या पुर्वपरिस्थितीचा उपयोग होईल.

प्रकरण दुसरे :-अहिल्याबाई होळकर यांचे जीवन चरित्र

प्रस्तुत प्रकरणात अहिल्याबाई होळकर यांच्या वडिलांचे कुळ,जन्म, बालपण,विवाह, होळकरांचे घराणे, वैवाहिक,कौटुंबिक जीवन, अपत्ये, दिनक्रम,सवयी, स्वभाव,इतर कार्य ह्या विषयी साधार विवेचन करण्यात येईल.

प्रकरण तिसरेः- अहिल्याबाई होऴकर यांचे राजकीय कार्य व वर्तमान संदर्भ

अहिल्याबाई होऴकर यांची जनतेशी असलेली बांधिलकी, प्रजाहितदक्षता,उत्तम प्रकारे चालविलेला राज्यकारभार,उत्पन्न व खर्च यांचे काटेकोर निजोजन, पैशाचा योग्य व जनकल्याणासाठी विनियोग करण्याची पद्धत,प्रशासनात घेतलेले निर्णय,राज्यकारभारविषयक धोरण, व इतर अनुषंगिक बाबींचा अभ्यास करण्यात येउन त्यांचे राजकीय योगदान व राज्यकारभारात स्वतःचा दबदबा कशाप्रकारे निर्माण केला हे सिद्ध करण्यात येईल.यातुन वर्तमानकाऴातील अशा प्रकारच्या कल्याणकारक कार्याचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण चौथेः- अहिल्याबाई होऴकर यांचे सामाजिक कार्य व वर्तमानकालीन संदर्भ

प्रस्तुत प्रकरणात अहिल्याबाई होऴकर यांनी समाजहितासाठी बांधलेली नदीवरील घाट, धर्मशाऴा, अन्नछत्रे,सदावर्ते,यात्रेकरुंसाठी निर्माण केलेल्या सोयीसुविधा,महेश्वरात उभा केलेला विणकरांचा व्यवसाय, इतर समाजोपयोगी कार्याचे विश्लेषण करण्यात येईल.वर्तमान जीवनात अशा प्रकारचे सामाजिक कार्य करण्या-या संस्थांचा आढावा घेऊन रोजगार निर्मिती, समाज सुधारणा यासाठी हे कार्य कशाप्रकारे उपयोगी होईल यांचे विश्लेषण केले जाईल.

प्रकरण पाचवे :- अहिल्याबाई होऴकर यांचे धार्मिक कार्य व वर्तमान संदर्भ

या प्रकरणात अहिल्याबाई होऴकर यांनी भारत देशाच्या चारी दिशांना केलेल्या मंदिरांचे जीर्णोद्धार, नविन बांधलेली मंदिरे, त्यांचे व्यवस्थापन, नियोजन व त्यातुन त्यांनी साधलेले जनकल्याण, वास्तुशिल्पविषयक योगदान इ बाबी सविस्तरपणे मांडण्यात येतील.व सद्यस्थितीत धर्मक्षेत्रातील स्थितीचे विवेचन करण्यात येईल.

प्रकरण सहावेः- सारांश व निष्कर्ष

या प्रकरणामध्ये संशोधन विषयाचा सारांश काढुन वर्तमान राजकीय, सामाजिक व धार्मिक जीवन कल्याणकारी, सकारात्मक होण्यासाठी अहिल्याबाईंच्या कार्यातुन निष्कर्ष काढण्यात येतील व प्रस्तुत विषयाची प्रासंगिकता, उपयोगिता सिद्ध

करण्यात येईल. तसेच वर्तमानकालीन अशा कल्याणकारी कार्याची माहिती देण्यात येईल.

टीपः संशोधनाला जशी गती येईल तसे संशोधन आराखड्यात थोडाबहुत बदल संभवतो.

<u>परिशिष्टे</u> :-

प्रस्तुत शोधनिबंध प्रभावी व वस्तुनिष्ठ होण्यासाठी विषयाला अनुसरुन खालील परिशिष्टे जोडण्यात येतील-

१) अहिल्याबाई होळकर यांचे छायाचित्रे
२) होळकर घराण्याची वंशावळ
३) .अहिल्याबाई होळकर यांनी जीर्णोद्धार केलेली व नविन बांधलेली निवडक मंदिरे,घाट, धर्मशाळा इ.ची छायाचित्रे
४) वर्तमानपत्रातील कात्रणे
५) नकाशे
६) इतर अनुषंगिक पत्रे, छायाचित्रे इ.

<u>संदर्भ सूचीः</u>-

मराठी-

- ठाकूर वा.वा. (संपा.), होळकरशाहीच्या इतिहासाची साधने : भाग1, भाग 2, होळकर गव्हर्नमेंट प्रेस,इंदुर-1944
- पारसनीस द.ब (संपा.),महेश्वर दरबाराची पत्रे: भाग1, भाग2 : महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई-2021
- पेशवे दप्तरः खंड 2, खंड 19, खंड 21:शासकीय मुद्रणालय,मुंबई-1978

सहाय्यक इतिहास ग्रंथ-

- आपटे वा.गो.,पेशवाईची हकिगतः महाराष्ट्र साहित्य परिषद,पुणे-2002

- कुलकर्णी अ.रा.(संपा.), मराठ्यांचा इतिहास: खंड 2 आणि 3: कॉन्टिनेन्टल प्रकाशन,पुणे-2016
- केळकर य.न. (संपा.), होळकरांची कैफियतः महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई-2022
- चित्राव सिद्धेश्वरशास्त्री (संपा.), मध्ययुगीन चरित्रकोशः भारतीय चरित्रकोश मंडळ,पुणे-1964
- सरदेसाई गो.स., ब्रिटिश रियासत भाग 1 आणि 2: **पॉप्युलर प्रकाशन, मुंबई-1993**
- सरदेसाई गो.स., मुसलमानी रियासत: भाग 2: **पॉप्युलर प्रकाशन, मुंबई-1993**
- सरदेसाई गो.स., मराठी रियासत: खंड 7: **पॉप्युलर प्रकाशन, मुंबई-1993**
- होळकरशाहीचा इतिहास भाग 1 (इ.स. 1693 ते इ.स.1797): होळकर गव्हर्नमेंट प्रेस,इंदुर-1944

ऐतिहासिक चरित्रे -

- खडपेकर विनया,ज्ञात-अज्ञात अहिल्याबाई होळकर: राजहंस प्रकाशन पुणे,डिसेंबर-**2012**
- शर्मा उदयभानू, लोकमाता अहिल्या (हिंदी)

नियतकालिके:-

१) देवी अहिल्याबाई होळकर चॅरिटीज ट्रस्ट,इंदौर येथून अहिल्याबाईविषयी प्रसिद्ध झालेल्या सर्व स्मरणिका

२) विविध ज्ञानविस्तार 1907: अंक 5

संशोधक — मार्गदर्शक

व्यंकटेश भगवानराव पेचफुले — **डॉ. उत्तम राठोड**

प्राचार्य,नुतन महविद्यालय सेलू